# मिरा भाईंदर महानगरपालिका

# सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६

## //प्रेसनोट//

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे आदेशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकं २०२५-२६ करीता निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ कामकाजाकरीता ठाणे व पालघर या जिल्हयांतील कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी पालघर यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकी करीता विक्रमगड तालुक्यातील ९७२ व डहाणू तालुक्यातील -१७५२ कर्मचारी उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्याप्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ३५८६ अधिकारी/कर्मचाऱ्यांची PRO, PO१, PO२ व PO३ म्हणुन नेमणूक करण्यात आलेली असुन दि.२६/१२/२०२५ व दि.२७/१२/२०२५ रोजी प्रथम प्रशिक्षण तसेच दि.०५/०१/२०२६ व दि.०६/०१/२०२६ रोजी व्दितीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे.

दि.२६/१२/२०२५ व दि.२७/१२/२०२५ रोजीच्या प्रशिक्षणास बहुतांश अधिकारी/कर्मचारी अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आलेले आहे, त्यामुळे सदर अनुपस्थित कर्मचाऱ्यांचे दि.०२/०१/२०२६ रोजी पुन:श्च प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षणास गैरहजर राहणा-या कर्मचा-यां विरुदध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६ तसेच लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील कलम १३४ नुसार शिस्तभंगाची तसेच फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत केली जाणार आहे.

**(संभाजी पानपट्टे)**
अतिरिक्त आयुक्त (निवडणूक)
मिरा भाईंदर महानगरपालिका